# प्रेस नोट

प्रॉपर्टी सेल,गुन्हे शाखा, पुणे शहर
दिनांक – ०८/०९/२०१८

## तडीपार आरोपीस एक वर्षाची शिक्षा

वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे हद्दीत दि.०५/९/२०१८ रोजी प्रॉपर्टी सेलचे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे घरफोडी चोरी प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करीत असताना वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे रेकॉर्ड वरील तडीपार इसम नामे इक्बाल मंहमद शेख,वय-२४ वर्षे रा.अचानक चौक,रामनगर,वारजे,पुणे हा मिळून आला. त्यास ताब्यात घेऊन त्याबाबत माहिती/ घेतली अस/ता, मा.पोलीस उप-आयुक्त,सो.परि.१ यांचे तडीपार आदेश अन्वये क्र.४१/२०१७, दि-३१/०८/२०१८ अन्वये २ वर्षासाठी तडीपार होता. त्या आदेशाचा आरोपीने भंग केल्याने त्याचे विरुध्द वारजेमाळवाडी पोलीस ठाणे गु.र.नं.२८४/२०१८ महाराष्ट्र पोलीस कायदा क.१४२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास श्री.समीर शेख,सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे १,पुणे शहर यांचे आदेशाने व मार्गदर्शनाखाली प्रॉपर्टी सेलचे पोलीस उप-निरीक्षक श्री.दिंगबर जाखडे यांनी करुन पुरावा गोळा करुन आरोपीस दोषारोपपत्रासहीत दि.०६/०९/२०१८ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं.३,पुणे यांचे न्यायालयात हजर केले.तसेच मा.न्यायालयास समरी ट्रायल घेणेबाबत विनंती केली असता,मा.न्यायालयाने केस बोर्डावर घेवून साक्षी पुरावे नोंदवून दि.०७/०९/२०१८ रोजी तडीपार आरोपीस १ वर्षे सक्तमजुरी व ५,०००/- दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे शहर श्री.शिरीष सरदेशपांडे,सो. मा.सहा.पोलीस आायुक्त,गुन्हे १,पुणे श्री.समीर शेख,सो, मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,प्रॉपटी सेल,गुन्हे शाखा,पुणे श्री.दिपक निकम सो, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, श्री श्री.दिंगबर जाखाडे, व अजय म्हेत्रे, तसेच पोलीस कर्मचारी अनिल शिंदे, प्रविण तापकीर, राजा झुजुंरके, राजाभाऊ भोरडे, सचिन ढवळे, उत्तम तारु यांच्या पथकाने केली आहे.